दैनिक लोकमत

दि. ०६.०९.२०२६

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीची सूचना

मे. कोरलाईफ रिटेल प्रायव्हेट लिमिटेड (सी. आर.पी.एल) यांनी त्यांच्या प्रस्तावित १० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा केळी, इतर फळे तसेच मोहफुलांपासून एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल (ENA) उत्पादन प्रकल्प, ३,००० केसेस प्रतिदिन क्षमतेचा बॉटलिंग प्रकल्प स्वतंत्र माल्ट स्पिरिट व ग्रेप स्पिरिट उत्पादन प्रकल्प तसेच फळांच्या कचऱ्यापासून ३ टन प्रतिदिन क्षमतेचा बायो - कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (Bio- CNG) उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी गट क्र. ८१/८२/८९, मौ. खेड, ता. लोहारा, जि. धाराशिव, येथे प्रस्तावित केला असून या नियोजित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला आहे व यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण तथा वन मंत्रालयाच्या **EIA notification No. S.O. १५३३** दिनांक १४.०९.२००६ (व सुधारीत दिनांक ०१.१२.२००९) च्या अधिसूचनेनुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टीका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदवण्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे आयोजन केले आहे. सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरूपात सूचना, विचार, टीका, टिप्पणी ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत जाहीर सुनावणीच्या तारखेपूर्वी खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

उप-प्रादेशिक कार्यालय,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,प्लॉट नं. पी - १०, लातूर जिल्हा उद्योग समुह इमारत,एम. आय. डी. सी. लातूर- ४१३५३१ई-मेल- srolatur@mpcb.gov.in

**सुनावणीचे ठिकाण :-** मे. लोकमंगल माऊली इंडस्ट्रिज लि., (प्रशासकीय इमारत),गट क्र. ८२/१, मौ. लोहारा (खुर्द) व खेड, ता. लोहारा, जि. धाराशिव.

**सुनावणीची तारीख :-** ०९.१०.२०२६

**सुनावणीची वेळ :-** सकाळी ११:३० वाजता.

त्याचप्रमाणे, सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्यप्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी विचार, टीका, टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरूपात जाहीर सुनावणी दरम्यान सुद्धा नोंदविता येतील.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तावेज (इंग्रजी व मराठी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती खालील कार्यालयामध्ये सदर कागदपत्रे कार्यालयीन वेळेत अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव. २. जिल्हा परिषद कार्यालय, धाराशिव.

३. जिल्हा उद्योग केंद्र, धाराशिव.

४. तहसिल कार्यालय लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव.

५. ग्रामपंचायत कार्यालय, लोहारा खुर्द व खेड, लोहारा (बुद्रुक), मालेगाव, माकणी, धानोरी, करजगाव, नागोर, लोहटा, हिप्परगा, वडगाव, वडगाववाडी, वडाचा तांडा, मोघा (बुद्रुक), मोघा (खुर्द), बेलवाडी, शिवकरवाडी, तावशीगड, बेंडकळ ७, मर्डी, काष्टी (खुर्द), काष्टी (बुद्रुक), कानेगाव, भातांगळी, नागराळ, विसालपूर पांढरी, ता. लोहारा, जि. धाराशिव.

६. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी- १०, लातूर जिल्हा उद्योग समुह इमारत, एम. आय. डी. सी. लातूर- ४१३५३१.

७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्र. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, दैनिक लोकपत्रच्या मागे, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल शेजारी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर.

८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईंट, ३ रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं.८, शीव (पूर्व), मुंबई-४०००२२.

९. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

स्वाक्षरीत/-
(प.वि.नाईक)
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर.